साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेच्या मार्गदर्शक तत्वाच्या शासन निर्णयात सुधारणा.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: विघयो-२६१७/प्र.क्र.०९/नवि-४
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- २२ ऑगस्ट, २०१९

वाचा:-

१) शासन निर्णय ,नगर विकास विभाग, क्रमांक:-विघयो १०२०००/१५९२/प्र.क्र.१८९/नवि-४, दि. ५.३.२००२.
२) शासन शुध्दीपत्रक ,नगर विकास विभाग, क्रमांक :-डिव्हिवाय-२६१५/प्र.क्र.१६२/नवि-४, दि. १२ ऑगस्ट,२०१५.
३) शासन निर्णय ,नगर विकास विभाग, क्रमांक:- विघयो-२०१३/प्र.क्र.१८२/नवि-४, दि. १ सप्टेबर,२०१६.
४) शासन निर्णय ,नगर विकास विभाग, क्रमांक:-विघयो-२६१७/प्र.क्र.०९/नवि-४, दि.२ मार्च,२०१७.
५) शासन निर्णय ,नगर विकास विभाग, क्रमांक:- विघयो-२०१३/प्र.क्र.१८२/नवि-४, दि. २१ ऑगस्ट,२०१९.

प्रस्तावना:-

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना (पूर्वीची नागरी दलित वस्ती सुधार योजना) या योजनेच्या अंमलबजावणीबाबतचे मार्गदर्शक तत्वे दिनांक ०५ मार्च, २००२ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आले आहेत. या योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेली कामे दिनांक ०५ मार्च, २००२ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ६ मध्ये नमूद करण्यात आली आहेत. त्यामध्ये शौचालय बांधणे या घटकासाठी देखील निधीचा वापर अनुज्ञेय आहे. सदर योजनेंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत करण्यात येणाऱ्या निधीमधून स्वच्छ भारत अभियान अंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या अनुदाना व्यतिरिक्त आणखी आवश्यक असलेले अनुदान देण्यासाठी सदर निधीचा वापर करणे अनुज्ञेय करण्यासाठी या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

संदर्भांकित अनुक्रमांक ४ येथील दिनांक २ मार्च,२०१७ चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे.

०२. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतर्गत मंजूर करण्यात येणाऱ्या अनुदानामधून स्वच्छ भारत अभियान अंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधकाम करण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे प्रति लाभार्थी अधितम रु. ५०००/- च्या मर्यादेत अतिरिक्त अनुदान जिल्हा स्तरीय समितीस मंजूर करता येईल.

०३. सदरचे अनुदान हे स्वच्छ महाराष्ट्र अभियानाअंतर्गत वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून प्रति लाभार्थी रुपये १२,०००/- प्रमाणे देण्यात येणाऱ्या अनुदानाव्यतिरिक्त तसेच, १४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून देण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्श्याव्यतिरिक्त असेल.

०४. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतर्गत राज्य शासनाकडून प्राप्त अनुदानाचे वितरण करण्यासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर विचार करताना जिल्हास्तरीय समितीने अशा स्वरुपाच्या प्रस्तावांना देखील मान्यता द्यावी. संपूर्ण नागरी महाराष्ट्र हागणदारी मुक्त करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीने अशा प्रस्तावांचा प्राधान्याने विचार करावा.

०५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२३१४३८०४४८२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Pandurang Jotiba Jadhav

Digitally signed by Pandurang Jotiba Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=300d785e12fdc19db0612f1ffdf83e54efe7da2b1bc63d18df8e09b3c7eece65, cn=Pandurang Jotiba Jadhav
Date: 2019.08.23 17:02:00 +05'30'

(पां. जो. जाधव)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, नगर विकास विभाग (१) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव, नगर विकास विभाग (२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
९. महालेखापाल कार्यालय, महाराष्ट्र १ व २ , मुंबई/नागपूर
१०. आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई
११. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, मुंबई
१२.अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, मुंबई
१३.अधिदान लेखा अधिकारी, मुंबई
१४.अधिदान लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई उपनगर
१५. सर्व विभागीय आयुक्त
१६. सर्व, जिल्हाधिकारी
१७. आयुक्त, सर्व महानगरपालिका

१८. सर्व नगरपरिषदा/नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
१९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२०. उप सचिव, नगर विकास विभाग (नवि-३४) मंत्रालय, मुंबई
२१.कार्यासन (नवि-३४), नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई
२२.निवड नस्ती, (नवि-४).